## आर्थिक समृद्धी आणि सुरक्षेवर क्वाड संयुक्त प्रसिद्धीपत्रक

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री आणि ऑस्ट्रेलिया, भारत व जपानचे परराष्ट्र मंत्री 31 ऑक्टोबर 2026 रोजी अटलांटा, जॉर्जिया येथे एकत्र आले. या भेटीदरम्यान त्यांनी क्वाड अंतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांच्या प्रगतीवर चर्चा केली आणि मुक्त व खुल्या इंडो-पॅसिफिक क्षेत्राप्रती आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली.

जागतिक स्थिरता आणि समृद्धी राखण्यात आर्थिक सुरक्षेचे महत्त्व क्वाड मंत्र्यांनी अधोरेखित केले. त्यांनी विश्वसनीय आणि खुले जागतिक पुरवठा साखळी आणि विश्वसनीय आणि लवचिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. त्यांनी आर्थिक सक्तीबद्दल, ज्यात मनमानी निर्यात निर्बंधांचा समावेश आहे, तसेच गैर-बाजारपेठीय धोरणे आणि पद्धतींबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली, ज्यामुळे महत्त्वाच्या उद्योगांमध्ये अतिरिक्त उत्पादनक्षमता निर्माण होऊन जागतिक पुरवठा साखळ्यांमध्ये व्यत्यय येतो. महत्त्वाचे सागरी मार्ग, व्यापाराचा अखंड प्रवाह, ऊर्जा सुरक्षा, तसेच कोणत्याही शुल्काशिवाय जहाजे आणि त्यांच्या कर्मचारी वर्गाची सुरक्षित व निर्धोक ये-जा यांचे महत्त्व ओळखून, त्यांनी यूएनसीएलओएस मध्ये प्रतिबिंबित आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार होर्मुझची सामुद्रधुनी, रेड सी आणि बाब-अल-मंदेब सामुद्रधुनीमध्ये नौवहनविषयक अधिकार व स्वातंत्र्याचे रक्षण आणि जतन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे पुन्हा अधोरेखित केले.

क्वाड मंत्र्यांनी आर्थिक विकासाच्या भविष्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पॅक्स सिलिकासारख्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले आणि क्वाड एआय ॲक्सिलरेटरसह, संपूर्ण इंडो-पॅसिफिकमध्ये विश्वसनीय एआयच्या उपलब्धतेला पाठिंबा देण्यासाठी 85 दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य देण्याचा आपला मानस व्यक्त केला.

क्वाड मंत्र्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शांतता तसेच सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या ऑनलाईन आणि सायबर फसवणुकीच्या वाढत्या प्रमाणावर तीव्र चिंता व्यक्त केली. त्यांनी फसवणुकीचे व्यवहार चालवणाऱ्या, मानवी तस्करी करणाऱ्या आणि आपल्या नागरिकांची फसवणूक करण्यास लोकांना भाग पाडणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांचा निषेध केला. या टोळ्या दरवर्षी आपल्या संबंधित देशांमधील कष्टाने कमावलेल्या अब्जावधी डॉलरच्या संपत्तीची चोरी करतात. क्वाड देशांनी हे गुन्हेगारी व्यवहार उद्ध्वस्त करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी टोळ्यांना तसेच त्यांच्या प्रमुखांना जबाबदार धरण्यासाठी कटिबद्धता दर्शवली आहे.

26 ऑगस्ट 2026 रोजी आलेल्या आकस्मिक महापुरात ज्यांना आपले प्राण गमवावे लागले, त्यांच्याबद्दल क्वाड मंत्र्यांनी तीव्र संवेदना व्यक्त केल्या आणि अडचणीच्या वेळी भागीदारांना सहाय्य करण्यासाठी त्यांची सामायिक वचनबद्धता अधोरेखित केली. त्यांनी नेपाळमधील बचावकार्यात प्रथम

प्रतिसादकर्ता म्हणून भारताच्या अग्रगण्य भूमिकेची, तसेच क्वाड देशांकडून नेपाळला मिळालेल्या महत्त्वपूर्ण समर्थनाची दखल घेतली.

इंडो-पॅसिफिकच्या समृद्धीला बळकटी देणाऱ्या प्रमुख उपक्रमांवरील प्रगतीचे क्वाड मंत्र्यांनी स्वागत केले, ज्यामध्ये समाविष्ट आहे:

आर्थिक समृद्धी आणि सुरक्षा

महत्त्वपूर्ण खनिजे पुरवठा साखळी सुरक्षित करणे: मे 2026 मध्ये घोषित क्वाड महत्त्वपूर्ण खनिज उपक्रम चौकटी अंतर्गत, क्वाड देशांनी महत्त्वपूर्ण खनिज पुरवठा साखळीवर त्यांचे सहकार्य मजबूत केले आहे, कोणत्याही एका पुरवठादारावर अवलंबून राहणे कमी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स कचरा आणि स्क्रॅप मटेरियल मधून महत्त्वपूर्ण खनिजे वसूल करण्यासाठी एकत्रितपणे काम केले आहे. त्यांनी कचरा संकलन नेटवर्क, प्रक्रिया संयंत्रे आणि रिफायनरींमध्ये खाजगी क्षेत्राच्या नेतृत्वाखालील गुंतवणुकीचे स्वागत केले, तसेच महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुनर्वापराच्या विश्वसनीय मूल्य साखळ्या स्थापित करण्यासाठी क्वाड देशांसोबत काम करण्याचेही स्वागत केले. भारत आणि आसियान देशांमध्ये कचऱ्यातून महत्त्वपूर्ण खनिजे पुनर्प्राप्त करण्यासाठी पायाभूत सुविधा आणि सुविधांना चालना देण्याकरिता 10 दशलक्ष डॉलर्स देण्याच्या अमेरिकेच्या वचनबद्धतेचे त्यांनी स्वागत केले. क्वाड देश पुनर्वापरयोग्य साहित्याची सीमापार ने-आण सुलभ करण्यासाठी आयात-निर्यात प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित करण्याच्या शक्यता तपासण्यास, तसेच विद्यमान नियमांची अंमलबजावणी अधिक बळकट करण्यास उत्सुक आहेत.

इंडो-पॅसिफिकमधील ऊर्जा सुरक्षेला पाठिंबा: सप्टेंबरमध्ये, क्वाडने प्रथमच क्वाड इंधन सुरक्षा मंच आयोजित केला आणि आपापले सामरिक पेट्रोलियम साठे व संग्रह मजबूत करण्यासह, इंडो-पॅसिफिकमधील इंधन सुरक्षा पुढे नेण्याच्या आपल्या वचनबद्धतेवर चर्चा केली.

फिजी मधील बंदरांच्या पायाभूत सुविधांचा विकास: सुवा, लौटोका आणि रोकोबिलि येथील प्रमुख बंदरांसाठी पायाभूत सुविधा आधुनिकीकरण प्रकल्पांवर क्वाड देश फिजी सरकारसोबत सक्रियपणे काम करीत आहेत. यामध्ये अमेरिकेच्या मिलेनियम चॅलेंज कॉर्पोरेशनचा समावेश आहे, जे फिजीला बंदर धोरणात्मक विकास आराखडा तयार करण्यासाठी पाठिंबा देत आहे, आणि ऑस्ट्रेलिया सरकारचा समावेश आहे, जे नवीन ट्रान्सशिपमेंट बंदर सुविधेच्या व्यवहार्यतेचे मूल्यांकन करत आहे.

इंडो-पॅसिफिक क्षेत्रात पायाभूत सुविधाविषयक क्षमता निर्माण करणे: आतापर्यंत, क्वाड देशांनी पॅसिफिक, आग्नेय आशिया आणि दक्षिण आशियामध्ये पायाभूत सुविधांशी संबंधित 2000 हून अधिक

फेलोशिप्स प्रदान केल्या आहेत. याद्वारे इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील राष्ट्रांना महत्त्वपूर्ण कौशल्ये मिळवून दिली जात आहेत, ज्यामुळे एक अधिक सक्षम आणि लवचिक प्रदेश घडवण्यास मदत होत आहे.

व्यावसायिक मुत्सद्देगिरीला चालना: क्वाड मंत्र्यांनी पहिल्या-वहिल्या क्वाड बिझनेस लीडर्स फोरमची घोषणा केली, जो क्वाड देशांमधील उद्योगपती, सरकार आणि धोरण तज्ञांना एकत्र आणेल. याचा उद्देश आपल्या सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांमध्ये अधिक चांगले संबंध प्रस्थापित करणे, तसेच प्रमुख क्षेत्रांमधील व्यावसायिक करारांना प्रोत्साहन देणे हा आहे. क्वाड निर्यात पतसंस्था, त्यांच्या 2024 च्या सहकार्य सामंजस्य करारावर आधारित, व्यावहारिक सहकार्याच्या संधी ओळखण्यासाठी 18 नोव्हेंबर रोजी टोकियो येथे एकत्र येतील, आणि यातून आर्थिक सहकार्य अधिक दृढ करण्याप्रती असलेली आमची वचनबद्धता अधिक स्पष्ट होईल.

इंडो-पॅसिफिकमध्ये सुरक्षित आणि लवचिक डिजिटल कनेक्टिव्हिटीची प्रगती: क्वाड देश या प्रदेशात विश्वसनीय, अप्रतिम आणि उच्च-गती केबल मार्ग विकसित करण्यासाठी प्रयत्नांना गती देत आहेत आणि सुरक्षित आणि लवचिक सागरी डाटा केबल्स व्यवस्थापित करण्यासाठी सर्वोत्तम पद्धती सामायिक करतात.

सागरी आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा

समुद्रांना अधिक सुरक्षित बनवणे: बेकायदेशीर सागरी कारवायांना तोंड देण्यासाठी क्वाडची सागरी आंतरकार्यक्षमता मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, दुसरे क्वाड-ॲट-सी शिप ऑब्झर्वर अभियान 25 सप्टेंबर ते 7 ऑक्टोबर दरम्यान भारतीय तटरक्षक दलाच्या ऑफशोअर पेट्रोल व्हेसलवरून, क्वाडच्या चारही देशांच्या प्रतिनिधींसह भारतातील चेन्नई येथून ऑस्ट्रेलियातील पर्थपर्यंत यशस्वीरित्या पार पडले.

सागरी सहकार्य मजबूत करणे: क्वाड देश सी ड्रॅगन 2027 येथे इंडो-पॅसिफिक सागरी संनिरीक्षण सहकार्य उपक्रमांतर्गत त्यांचा पहिला सराव आयोजित करण्यास उत्सुक आहेत. माहितीची देवाणघेवाण आणि सागरी क्षेत्राबाबतची जागरूकता वाढवण्यासाठी, नवी दिल्ली येथे मे महिन्यात सचिव आणि परराष्ट्र मंत्र्यांकडून या उपक्रमाची घोषणा करण्यात आली.

सागरी क्षेत्र जागरूकता (एमडीए) सुधारणे: क्वाड देश, क्वाड मेरीटाइम ट्रेनिंग इनिशिएटिव्ह (मैत्री) अंतर्गत, 2027 च्या सुरुवातीस पहिल्या क्वाड मेरीटाइम डोमेन अवेअरनेस ट्रॅक 1.5 सिम्पोजियमचे आयोजन करण्याची घोषणा करत आहेत. हे व्यासपीठ प्रादेशिक भागीदारांना एमडीए दृष्टिकोन, तंत्रज्ञान आणि माहिती देवाणघेवाणीबाबत चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देईल.

महत्त्वपूर्ण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान

विश्वसनीय कम्युनिकेशन्स नेटवर्क्स: 6G नेतृत्व आणि सुरक्षेसाठीच्या कॉल टू ॲक्शनला क्वाड नेत्यांनी दिलेल्या समर्थनाला अनुसरून, क्वाड देशांनी 5G, 6G, ओपन रेडिओ ॲक्सेस नेटवर्क (आरएनएन) आणि एआय आरएएन यांसारख्या विश्वासार्ह प्रगत कम्युनिकेशन्स तंत्रज्ञानावरील सहकार्यासाठी प्राधान्यक्रमाच्या देशांची ओळख पटवणे, विश्वासार्ह 5G प्रकल्पांची एक साखळी विकसित करणे, तसेच एआय आरएएन वरील भविष्यातील सहकार्याची शक्यता पडताळणे यासाठी बांधीलकी व्यक्त केली आहे.

अर्धवाहक आणि एआय हार्डवेअर: क्वाड देशांनी प्रगत, अग्रगण्य अर्धवाहक आणि एआय हार्डवेअरसाठी सुरक्षित, लवचिक आणि विश्वसनीय पुरवठा साखळ्या निर्माण करण्याच्या गरजेवर भर दिला. व्यत्यय निर्माण होण्यापूर्वीच अर्धवाहक आणि एआय पुरवठा साखळीतील अडथळे ओळखण्यासाठी ते एक नवीन मोहीम सुरू करतील.

डिजिटल ओळख मानके: क्वाड देश डिजिटल ओळख मानकांचे मॅपिंग करण्याच्या दिशेने आपले प्रयत्न पुढे नेत आहेत, ज्यामुळे आमच्या सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांमधील सहकार्य अधिक सुलभ होत आहे.

सायबर सुरक्षेवरील सहकार्य अधिक दृढ करणे: या महिन्यात, क्वाड सायबर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशात एक विश्वासार्ह आणि लवचिक सायबर सुरक्षा वातावरण निर्माण करण्यासाठी क्वाड देशांच्या अद्वितीय क्षमतांना पुढे नेण्याचे वचन त्यांनी दिले.

मानवतावादी साहाय्य आणि आपत्कालीन प्रतिसाद

आपत्तींना प्रतिसाद देण्याची क्षमता निर्माण करणे: क्वाड आपल्या मानवतावादी साहाय्य आणि आपत्ती निवारण भागीदारी द्वारे नैसर्गिक आपत्तींना प्रतिसाद देण्याच्या क्षमतांमध्ये सातत्याने सुधारणा करत आहे. नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी सामायिक क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिका हे देश नोव्हेंबरमध्ये भारताच्या वार्षिक संयुक्त मानवतावादी साहाय्य आणि आपत्ती निवारण सरावात (एजेएचई-26) आपले निरीक्षक पाठवतील.

सामायिक लॉजिस्टिक क्षमतांचा विकास: जपानच्या संरक्षण मंत्रालयाद्वारे सप्टेंबरमध्ये आयोजित दुसऱ्या आयपीएलएन टेबलटॉप एक्सरसाइज (टीटीएक्स) दरम्यान, क्वाड देशांनी इंडो-पॅसिफिक लॉजिस्टिक्स नेटवर्क (आयपीएलएन) च्या मानक कार्यप्रणालीचा विकास करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे. यामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशात नैसर्गिक आपत्तींना जलद आणि प्रभावी प्रतिसाद देणे शक्य होईल. क्वाड देश आपापल्या सामायिक मानवतावादी साहाय्य आणि आपत्ती निवारण (एचएडीआर) लॉजिस्टिक क्षमतेचा विकास करणे सुरू ठेवतील, यामध्ये रिम ऑफ द पॅसिफिक (आरआयएमपीएसी) सरावादरम्यान आयोजित केला जाणारा पुढील आयपीएलएन सराव देखील समाविष्ट असेल.

आम्ही क्वाड नेत्यांची शिखर परिषद, पुढील क्वाड परराष्ट्र मंत्र्यांची बैठक आयोजित करण्यासाठी आणि इंडो-पॅसिफिक आणि त्यापलीकडे शांतता, स्थिरता आणि समृद्धी वाढविण्यासाठी आमचे संबंध सुरू ठेवण्यासाठी उत्सुक आहोत.

अटलांटा

31 ऑक्टोबर 2026